# फ्लिपकार्टने केली 'फ्लिपमार्च' उपक्रमाची घोषणा, आपल्या कर्मचारीवृंदात ज्येष्ठ लष्करी जवानांचा समावेश करणार

- *लष्करी दलासोबतच्या भागीदारीतून त्यांच्या माजी जवानांना ई-कॉमर्समधील भरभराटीच्या करिअरमध्ये संधी देणार*
- *आर्मी वेलफेअर प्लेसमेंट ऑर्गनायझेशन (एडब्ल्यूपीओ)सोबतच्या भागीदारीतून विविध कामांसाठी जवानांना शोधणे आणि त्यांना संधी देणे शक्य होणार*
- *माजी जवानांना कॉर्पोरेट आणि पुरवठा साखळीसह विविध मूल्य साखळीत संधी देणार आणि त्यांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शनही उपलब्ध करून देणार*

**बंगळुरु** – **२६ नोव्हेंबर २०२० :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने लष्करी दलांसोबतच्या भागीदारीतून सुरू करण्यात आलेल्या 'फ्लिपमार्च' या उपक्रमाची घोषणा केली. त्यांच्या संपूर्ण मूल्य साखळीत या उपक्रमाच्या माध्यमातून माजी जवानांना काम दिले जाणार आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून आपल्या संस्थेत विविध कामांसाठी योग्य उमेदवारांचा शोध आणि निवड यासाठी फ्लिपकार्टने आर्मी वेल्फेअर प्लेसमेंट ऑर्गनायझेशन (एडब्ल्यूपीओ) या संस्थेसोबत भागीदारी केली आहे.

या उपक्रमाअंतर्गत निवडक जवानांना खास वैयक्तिक इंडक्शन, सॅनिटायझेशन प्रोग्राम आणि खास तयार करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमातून कामातील बदल सहज अंगिकारण्यात साह्य करण्यात येईल आणि त्यांना विविध कॉर्पोरेट कामांमधील भूमिकांमधील खाचाखोचा शिकण्यातही साह्य केले जाईल. फ्लिपकार्टने माजी सैनिकांना कामाची संधी दिल्याने त्यांच्यासाठी करिअरचे नवे मार्ग खुले होतील आणि लष्करी दलांमध्ये काम केल्यानंतरच्या काळासाठी त्यांना अधिक पर्याय उपलब्ध होतील.

**या उपक्रमाबद्दल फ्लिपकार्टचे चीफ पीपल्स ऑफिसर कृष्णा राघवन म्हणाले,** "फ्लिपकार्ट ही सामाजिकरित्या जबाबदार संस्था आहे. ही संस्था समाज आणि त्यातील विविध घटकांच्या विकासासाठी काम करते. फ्लिपकार्टमध्ये आमच्यसोबत लष्करी दलातील काही माजी जवान विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत आहेत आणि आता हा उपक्रम आणखी पुढे नेत फ्लिपमार्चची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे. लष्करी दलांमधील जवानांची

कामावरील निष्ठा, शिस्त आणि धोका पत्करण्याची क्षमता हे गुण फ्लिपकार्टसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि एक दमदार संस्था उभारण्यात हे गुण महत्त्वाची भूमिका बजावतील."

**एडब्ल्यूपीओचे व्यवस्थापकीय संचालक मेजर जनरल दीपक सप्रा म्हणाले,** "या भागीदारीमुळे देशाची सेवा करणारे दोन प्रभावशाली सेवा पुरवठादार एकत्र आले आहेत - एक आहे एतद्देशीय ई कॉमर्स बाजारपेठ आणि दुसरी आहे ज्येष्ठ लष्करी जवानांना संधी उपलब्ध करून देणारी संस्था. फ्लिपकार्ट आणि एडब्ल्यूपीओ यांच्यातील या करारामुळे एकमेकांच्या बलस्थानांचा उपयोग करून ज्येष्ठ लष्करी जवानांना अर्थपूर्ण संधी उपलब्ध करून देण्याची दोन्ही संस्थांची कटीबद्धताही अधोरेखित झाली आहे. फ्लिपकार्ट समवेतची ही भागीदारी पुढे नेण्यास आम्ही उत्सुक आहोत."

एडब्ल्यूपीओनुसार, दरवर्षी ३०-४० या वयोगटातील ५०००० हून अधिक जवान निवृत्त होतात. लॉजिस्टिक, वर्कफोर्स मॅनेजमेंट, आपातकालीन स्थिती हाताळणे अशा विविध क्षेत्रांमध्ये ते प्रशिक्षित असल्याने मोठ्या संस्थांसाठी ते उत्तम निवड ठरतात.

**फ्लिपकार्टचे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर रजनीश कुमार** म्हणाले, "अधिक जबाबदार कॉर्पोरेट संस्कृतीची उभारणी करत असताना विविध घटकांना एकत्र आणण्याचे महत्त्व फ्लिपकार्ट जाणते. माजी जवानांचा आमच्या कर्मचाऱ्यांमध्ये समावेश केल्याने लष्करी दलांसंदर्भात असलेली आमची बांधिलकी अधोरेखित होते आणि यातून एक दीर्घकालीन नाते प्रस्थापित होते. आमच्या मूल्य साखळीत त्यांचा समावेश केल्याने त्यांच्या चटकन निर्णय घेणे आणि सतत बदलणाऱ्या स्थितीतही अंतिम ध्येय गाठण्याची त्यांची क्षमता यांचा आम्हाला फायदा होऊ शकेल." फ्लिपकार्टच्या कॉर्पोरेट ऑफिसेस, पुरवठा साखळी आणि सुरक्षा व्यवस्थापनात अनेक माजी जवानांना नेमण्यात आले आहे आणि कंपनीच्या दैनंदिन कामकाजात ते अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. कॉर्पोरेट कार्यालयांमधील १२००० हून अधिक कर्मचारी आणि पुरवठा साखळीतील जवळपास १.८ लाख लोक यामुळे विविध व्यावसायिक पातळ्यांवर वेगवान काम करण्याची अनोखी संधी फ्लिपकार्टमुळे मिळते.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**